
म्हणी सांगतात
कहाणी
सरोज चौगुले
परी
प्रकाशन

**म्हणी सांगतात कहाणी**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२०१६

**किंमत :**
रुपये १३०/-

# अनुक्रमणिका


१. गर्जेल तो पडेल काय ? ........ ५

२. काखेत कळसा आणि गावाला वळसा ........ १०

३. कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ ........ १५

४. आळसाने कार्यभाग नासतो ........ १९

५. पी हळद हो गोरी ........ २३

६. नाचता येईना अंगण वाकडे ........ २७

७. एकीचे बळ मिळते फळ ........ ३१

८. दुरून डोंगर साजरे ........ ३६

९. हातच्या काकणाला आरसा कशाला ? ........ ४१

१०. गाढवाला गुळाची चव काय ? ........ ४६

११. म्हैस बाजारात आणि भांडण घरात ! ........ ५१

१२. पुढच्यास ठेच, मागचा शहाणा ........ ५६

१३. जात्यातले रडतात, सुपातले हसतात ........ ६०

१४. नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं ! ........ ६४

१५. अडला नारायण, गाढवाचे पाय धरी ........ ६९

१६. बुडत्याला काडीचा आधार ........ ७४

१७. उद्योग्याच्या घरी लक्ष्मी पाणी भरी ........ ७८

१८. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही ........ ८३

१९. भित्यापाठी ब्रह्मराक्षस ! ........ ८७

२०. आंधळा मागतो एक डोळा ........ ९१

२१. थेंबे थेंबे तळे साचे ........ ९६
२२. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ ........ १००
२३. जशास तसे ........ १०४
२४. अंथरूण पाहून पाय पसरावे ........ १०९
२५. प्रयत्नांती परमेश्वर ........ ११३
२६. बैल गेला आणि झोपा केला ........ ११८
२७. तेरड्याचा रंग तीन दिवस ........ १२३
२८. अति तिथं माती ........ १२७
२९. गर्वाचे घर खाली ........ १३१
३०. लहान मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ........ १३६
३१. गरज सरो, वैद्य मरो ........ १४०
३२. बोलाची कढी आणि बोलाचा भात ........ १४४
३३. दैवानं दिलं आणि कर्मानं नेलं ........ १४९
३४. हातचं सोडून पळत्याच्या मागे ........ १५३
३५. लोका सांगे ब्रह्मज्ञान ........ १५८
३६. नाव मोठं लक्षण खोटं ........ १६२
३७. करावे तसे भरावे ........ १६७
३८. इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो ........ १७१
३९. भिंतीला कान असतात ........ १७६
४०. बापसे बेटा सवाई ........ १८१

# गर्जेल तो पडेल काय ?

ऐका ऐका कहाणी, आटपाट नगराची. आटपाट नगरातल्या राजाराणीची. राजाराणीच्या लाडक्या राजपुत्राची. आटपाट नगराचं नाव शांतीपूर होतं. राजाचं नाव दयावान होतं. राणीचं नाव करुणादेवी होतं. राजपुत्राचं नाव यशोधन होतं. राजा नावासारखा दयाळू, कनवाळू होता. प्रजेच्या हिताकडं लक्ष देत होता. वेश पालटून तो रात्री राज्यामध्ये फिरायचा. लोकांच्या गप्पांमधून बोलण्यामधून त्याला राज्याची हालहवाल समजायची. प्रजेच्या अडचणी समजायच्या. त्या दूर करण्याचा तो प्रयत्न करायचा. राणीसुद्धा नावाप्रमाणेच मायाळू होती. प्रजेवर आईसारखी माया करणारी होती. राजपुत्रही त्यांना शोभण्यासारखा सुंदर होता. राज्याचा भावी वारसदार हाोता. तो सर्व गुणांनी, ज्ञानानी संपन्न व्हायला हवा होता. म्हणून राजाने त्याला एका विद्वान ऋषींच्या आश्रमात शिक्षणासाठी पाठवला होता.

ऋषींचा आश्रम राजधानीपासून दूर दाट जंगलात एका नदीकाठी होता. ना यंत्रांचा खडखडाट ना रथांचा धडधडाट, ना माणसांची गर्दी ना त्यांच्या बोलण्याचा कलकलाट. झाडं वेली, पानंफुलं यांनी वातावरण शांत, सुंदर, प्रसन्न झालेलं होतं. गुरूंच्या शिकवण्यात आणि शिष्यांच्या शिकण्यात कोणताच अडथळा नव्हता. मन विचलित होण्यासारखं काहीच नव्हतं. त्यामुळं मन एकाग्र होऊन गुरू जे शिकवतील ते लगेचच लक्षात यायचं. राजपुत्राला हे वातावरण आवडलं. राजवाड्यातले लाड, ऐषआराम विसरून राजपुत्र आश्रमात रमला. ऋषी महाराज जे जे शिकवतील ते पटापट शिकू लागला. ऋषींनी राजपुत्राला योग्य असे सारे शिक्षण त्याला दिले. सगळ्या कलागुणांनी संपन्न केले. शस्त्रास्त्रविद्या आणि युद्धकलेत निपुण बनवले. बघता बघता शिक्षण घेण्याचा ब्रह्मचर्याश्रम पार पाडण्याचा बारा वर्षांचा कालखंड संपला. राजपुत्राला


त्याच्या घरी परत पाठवायची वेळ आली; पण... ? पण... राजपुत्रामध्ये एक अवगुण होता. तो प्रयत्न करूनही नष्ट झाला नव्हता. तो कसा दूर करावा हा ऋषींना गहन प्रश्न पडला होता. अखेर त्यांनी मनाशी काही विचार केला आणि राजपुत्राला बोलावले. उंचनिच, देखणा, धिप्पाड राजपुत्र रुबाबात आला.

''प्रणाम गुरुदेव !'' ऋषी महाराजांच्या पायावर झुकून राजपुत्र बोलला.

''यशवंत हो ! आयुष्यमान् हो !'' ऋषींनी आशीर्वाद दिला.

''आपण मला कशासाठी बोलावलंत ? आज्ञा करावी.'' राजपुत्र म्हणाला.

''बाळ यशोधना, माझ्याकडे असणारे सगळे ज्ञान मी तुला दिले. तूही ते निष्ठेने ग्रहण केलेस. आता तू राज्यामध्ये जाशील युवराज होशील. कालांतराने राजाही होशील. माझा तुला शुभ आशीर्वाद आहे; पण जाण्यापूर्वी अजून एक छोटी परीक्षा तुला द्यावी लागेल. आहे तुझी तयारी ?'' ऋषींनी विचारले.



''हो ऽ. आहे ना तयारी ! कोणतीही, कसलीही परीक्षा घ्यावी. मी सज्ज आहे!'' राजपुत्र घाईनं म्हणाला.

''राजपुत्रा, परीक्षा फारच साधी सोपी आहे. एका साध्या सोप्या प्रश्नाचं उत्तर मला हवं आहे.'' ऋषी महाराजांनी सांगितलं.

''आपण बेशक प्रश्न विचारावा. मी उत्तर देईन.'' राजपुत्र बोलला.

''ठीक आहे.'गर्जेल तो पडेल काय?' या प्रश्नाचं उत्तर मला हवंय.'' ऋषीमहाराज गंभीरपणानं बोलले.

''हात्तिच्या ! एवढंच होय ? त्यात काय अवघड आहे ? जो गर्जना करतो तो तुटून पडणारच ना ? गर्जना करणारे वाघसिंह भक्ष्यावर तुटून पडतात. रणगर्जना करणारा योद्धा रणांगणात शत्रूवर तुटून पडतोच ना ? त्यात नवल काय ?'' राजपुत्र मोठ्यानं हसून उतावळेपणे उत्तरला.

''राजपुत्रा उत्तर इतकं सोपं असतं तर मी तुला प्रश्न विचारला असता का ? या प्रश्नाचं खरं उत्तर वेगळंच आहे. ते उत्तर निसर्गामध्ये आहे. तू प्रयत्नपूर्वक ते शोधून काढ आणि मला सांग. मगच तुला घरी जाता येईल. एक महिन्याची मुदत देतो तुला. जा. उत्तर शोधून लवकर ये.'' ऋषीमहाराजांनी त्याला आदेश दिला.

राजपुत्र खालमानेने निघून गेला. आपलं काय चुकलं हे त्याला काही केल्या लक्षात येईना; पण उत्तर शोधल्याशिवाय त्याला घरी जायला मिळणार नव्हते. त्यामुळं त्यानं प्रयत्न सुरू केला. मोठमोठे ग्रंथ त्यानं पालथे घातले; पण उत्तर सापडले नाही. उत्तर पुस्तकात, ग्रंथात नव्हतंच तर सापडणार कसं ? उत्तर निसर्गात सापडेल असं गुरुदेव म्हणाले होते. 'निसर्गात उत्तर आहे.' 'म्हणजे...? रानावनात भटकून उत्तर मिळवायला पाहिजे' असा विचार करून तो रानावनात, वाड्या वस्त्यांवर भटकला; पण उत्तर मिळाले नाही. इतर आश्रमातल्या गुरुदेवांनाही त्यानं विचारलं; पण ते म्हणाले,



''गुरुदेवांनी तुला उत्तर शोधायला सांगितलंय. तुझं तू शोधावंस हेच बरं नाही का ?''

बिचारा युवराज काय बोलणार ? भटक भटक भटकला आणि उत्तराशिवाय हिरमुसला होऊन परत निघाला. 'एक महिना' कालावधी संपला. नाइलाजानं पडल्या चेहऱ्यानं राजपुत्र आश्रमाकडे निघाला. आश्रमाच्या दारातच एक मित्र घाबरून धावत पळत येताना दिसला. राजपुत्रानं त्याला थांबवलं. विचारलं,

''काय रे काय झालं ? असा काय पळतोयस ?''

''अरे बाबा, एका रानटी भिल्लानं मारलेला ससा मी माझी शिकार समजून चुकीनं उचलला. तर तो माझ्यावर चिडला आणि माझा पाठलाग करतोय. त्याच्या राक्षसी पंजातून सुटून मी पळतोय. तूही पळ नाहीतर प्राणाला मुकशील'' मित्रानं घाबरून थरथरत सांगितलं आणि पुन्हा पळू लागला. तसे युवराजाने त्याला अडवले आणि आवेशाने म्हटले,

''अरे वेड्या, असा घाबरतोस कशाला ? मी आहे ना ! माझ्या बाणानं मी त्याचा हृदयभेद करीन. भाल्यानं, तलवारीनं त्याचा शिरच्छेद करीन. थांब ! माझ्यापुढे त्याचा अजिबात टिकाव लागणार नाही.''

''स्वत:कडे एकही हत्यार नसताना, माझ्या संरक्षणाची हमी घेणाऱ्या युवराजा, केवळ शब्दांनी धीर

देणाऱ्या तुझ्यावर कोण भरवसा ठेवणार ? गरजणाऱ्या ढगाकडून पाऊस पडेल अशी आशा कुणीच करत नाही. तू माझी काळजी करू नकोस. तुझा जीव तू वाचव.'' असं म्हणून तो मित्र पळून गेला; पण राजपुत्रानं आनंदानं उडी मारली आणि टाळी वाजवत तो म्हणाला,

''मिळालं ! माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं !''

इतक्यात भिल्ल येऊन राजपुत्राच्या अंगावर कोसळला. त्याला प्रतिकार करण्याइतकीही राजपुत्राला उसंत मिळाली नाही. तो धुळीत पडला. भिल्ल त्याच्या छातीवर बसून त्याचा गळा दाबणार इतक्यात ऋषींची हाक ऐकू आली.

''थांब ! किराता, थांब ! भानावर ये. तू ज्याचा पाठलाग करत होतास तो युवक हा नव्हे ! हा या राज्याचा युवराज आहे ! राजपुत्र आहे हा ! त्याचा वध करून केवढा भयंकर गुन्हा तुझ्या पदरी येईल याचा विचार कर ! ऊठ. बाजूला हो. सोड त्याला !''

ऋषी महाराजांची वाणी ऐकून भिल्लाचा सगळा आवेश जिरला. त्याची राजपुत्राच्या गळ्यावरची पकड ढिली झाली. त्यानं निरखून पाहिलं. आपल्याला हवा असणारा माणूस हा नव्हे हे त्याच्या लक्षात आलं. तो तटकन् उठून बाजूला झाला. राजपुत्रांची आणि ऋषींची क्षमा मागून तो जंगलाकडे चालता झाला. ऋषींनी राजपुत्राला उठवून आश्रमात नेले, धूळ झटकून पाणी प्यायला दिले. तो थोडा स्थिरस्थावर झाल्यावर ऋषींनी हळूच विचारले,

''मऽग ? राजपुत्रा, मिळालं का माझ्या प्रश्नाचं उत्तर ?''

''हो ! नुसत्या शाब्दिक वल्गना करणाऱ्याकडून प्रत्यक्ष कृती होत नाही. त्यामुळं त्याच्या भरवशावर कुणी राहत नाही हे मित्राच्या बोलण्यावरून आणि स्वत:च्या अनुभवावरून कळलं; पण असा प्रश्न कुणाला आणि का पडला असावा ते नीट नाही कळलं.'' खजील होऊन युवराज उत्तरला.

''राजपुत्रा, माणूस नेहमी निसर्गावरच अवलंबून असतो. खास करून शेतकरी ! शेतकऱ्याची शेती पावसावरच अवलंबून असते. वर्षभरातल्या एकूण सत्तावीस नक्षत्रांपैकी फक्त नऊ नक्षत्रं पावसाची असतात. या नक्षत्रांचा काळ–म्हणजे जून ते ऑगस्ट हा काळ–पावसाळ्याचा मानला जातो. या काळात पाण्यानं ओथंबलेले निळे, सावळे, काळे ढग आवाज न करता भरपूर पाऊस देतात. खरा दानशूर मनुष्य आपल्या दानाचा गाजावाजा करत नाही त्याप्रमाणे पाणी भरलेले ढग गडगडाट न करता भरपूर पाऊस देतात. शेतातील पिकांचं संवर्धन करतात. शेतकऱ्यांच्याच नव्हे साऱ्या जगाचेच जीवनरक्षण करतात; पण शरद ऋतूतले पांढरेशुभ्र ढग मात्र नुसताच गडगडाट करतात, पाऊस देत नाहीत. म्हणून शेतकरी त्याच्या गडगडाटावर भरवसा ठेवत नाहीत. अनेक वर्षांच्या निरीक्षणातून, अनुभवातून त्यांनी म्हण सिद्ध केली आणि प्रश्न विचारला 'गर्जेल तो पडेल काय ?' त्याचं उत्तर आहे – गरजणारा ढग पाऊस पाडत नाही.''

'शरदि न वर्षति गर्जति, वर्षति वर्षासु नि:स्वनो मेघ: !'

या संस्कृत श्लोकातसुद्धा हेच सांगितलं आहे (शरद ऋतूतले ढग आवाज न करता पावसाची वृष्टी करतात.) तात्पर्य गर्जना करणारा ढग पाऊस पाडत नाही. तशी स्वत:बद्दल बढाई मारणाऱ्या माणसाच्या हातून प्रत्यक्ष कृती होत नाही.

'भुंकणारा कुत्रा चावत नाही.' ही म्हणसुद्धा वरील म्हणीच्या अर्थाचीच आहे. म्हणजेच जो मनुष्य प्रत्यक्ष कृती करण्यापेक्षा अधिक बडबड करतो त्याच्या हातून भरीव कार्य होत नाही. म्हणून हे राजपुत्रा, प्रत्यक्ष काम करण्याआधी ते काम करण्याबद्दल वायफळ बडबड करू नये हे कळलं ना तुला ? नुसत्या बोलण्यात शब्दांचं शौर्य दाखवणाऱ्याला 'वाचीवीर' म्हणतात. शब्दांना कृतीची जोड देणाऱ्याला 'कृतिशूर' म्हणतात. तेव्हा हे राजपुत्रा, तू 'वाचीवीर' होणार की 'कृतिशूर' होणार हे तुझं तू ठरव !'' ऋषींनी राजपुत्रावरच निर्णय सोपवला.

''गुरुदेव, मला माझ्यातला दोष कळला. यापुढे मी 'वाचीवीर' न होता 'कृतिशूर' होईन. माझ्या बोलण्यावर लोकांचा विश्वास बसेल अशी मी माझ्या विचार, उच्चार, आचाराला कृतीची जोड देईन. माझ्या 'पिताश्री' सारखा प्रजाहितदक्ष राजा होईन. मला आशीर्वाद द्यावा!'' असं नम्रतेनं बोलत राजपुत्र ऋषींच्या पायावर झुकला.

'तथा ऽ स्तु ।' ऋषींनी आशीर्वाद दिला.

त्यानंतर राजपुत्र गुरूंचा निरोप घेऊन आपल्या राज्यात आला. राजा दयावान आणि राणी करुणादेवीनं त्याचं खूप मोठं स्वागत केलं. त्याला युवराज पदाचा अभिषेक केला. राजपुत्रानं आपल्यातला उतावळेपणा, काम करण्याआधी बडबड करणं हे दोष घालवून टाकले. पुढे तो मितभाषी, न्यायी, 'कृतिशूर' राजा झाला. राजा, राणी, युवराज, त्यांची प्रजा सगळे सुखी झाले. आनंदी झाले. तुम्ही आम्ही सुद्धा 'कृतिशूर' होऊ या. आनंदात, सुखात राहू या. वायफळ बडबड करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करू या.

✦✦

# काखेत कळसा आणि गावाला वळसा

विंध्यारण्यातल्या एका नदीकाठी घडलेली गोष्ट आहे ही. नदीचं नाव होतं दृषद्वती ! दृषद् म्हणजे दगड. नदीच्या पात्रात मोठमोठे कंगोरे असलेले दगड होते. दगडांच्या अडथळ्यातून मार्ग काढत नदी फुंफाटत एखाद्या नागिणीसारखी धावायची. म्हणून तिचं नाव दृषद्वती ! पाण्याला वेगही खूप होता. नेमक्या त्या ठिकाणी नदीच्या काठावर समोरासमोर दोन डोंगर होते. ऐलतटावर इंद्रगिरी होता. पैलतटावर चंद्रगिरी होता. इंद्रगिरीच्या माथ्यावर एक भक्कम किल्ला होता. चंद्रगिरीच्या डोक्यावर पण एक मजबूत किल्ला होता. इंद्रगिरीच्या राजाचं नाव होतं इंद्रजित. चंद्रगिरीच्या राजाचं नाव होतं चंद्रजित. दोन्ही राज्यांच्या मधून दृषद्वती नदी वाहत होती. तिचं रूप त्या ठिकाणी उग्र भीषण होतं त्यामुळं एकमेकांकडं जाणं येणं कठीणच होतं. नदीच्या बाजूला डोंगराचे तुटलेले उंच कडे होते. त्यावरून खाली उतरणं किंवा खालून वर चढणं माणसाला शक्यच नव्हतं. त्यामुळं दोन्ही राज्यात फारसं सख्य नव्हतं. तसं एकमेकात वैरही नव्हतं. आपापलं सैन्य सज्ज ठेवून ते आपल्या संरक्षणाची काळजी घेत.

एकदा काय झाले माहीत आहे ? इंद्रजित राजाची लाडकी राजकन्या 'इंद्रायणी' दृषद्वतीच्या पाण्यात स्नान करण्याचा हट्ट धरून बसली; पण राजाला तो अजिबात मान्य नव्हता. कारण दृषद्वतीचं पात्र माणसानं आंघोळीला, पोहायला पाण्यात शिरावं असं निर्धोक नव्हतं. दगड–धोंड्यातून ती अत्यंत वेगानं वाहत होतीच पण पुढे गेल्यावर एकदम संथ आणि खोल झाली होती. ज्याच्या तळाचा थांग लागणारच नाही असा खोल डोह होता तिच्या पात्रात ! या डोहात लहान मोठ्या मगरी मुक्कामाला होत्या. मनुष्याचा वास लागायचा अवकाश, त्या त्याला मगरमिठी घालत आणि पाण्यात ओढून नेत. त्यामुळं राजानं इंद्रायणीला 'जाऊ नको' म्हणून आदेश दिला; पण 'बालहट्टापुढं' भल्या भल्यांचं काही चालत नाही. इंद्रायणीच्या रुसण्यापुढं, हट्टापुढं इंद्रजितलाही झुकावं लागलं !